"भंगी "ऐवजी "रुखी" किंवा "बाल्मिकी"या तत्सम जातीचा उल्लेख करण्याबाबत

# महाराष्ट्र शासन

समाजकल्याण, सांस्कृतिक कार्य व क्रीडा विभाग,
शासन परिपत्रक क्रमांक : एसबीसी-१०९५/१२३१०/२२०/प्र.क्र.५२१/मावक-२
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई ४०००३२
दिनांक : ९ नोव्हेंबर, २०००.

**वाचा :-** संचालक, सामाजिक न्याय व अधिकारीता मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांचे अ.शा.प.क्र. १२०१७/९७-एससीडी (आरएल सेल), दिनांक ११ मे, २०००.

**परिपत्रक :-** अनुसूचित जातीच्या यादीमध्ये अनुक्रमांक १२ वर "भंगी" या जातीचा समावेश आहे. व त्या जातीची तत्सम जात म्हणून "रुखी" व "बाल्मिकी " या जातीचा समावेश आहे. "भंगी" हा सफाई कामाकरीता असलेल्या रुखी जातीच्या लोकांसाठी घृणास्पद व अपमानजनक बहिष्कृत अशा अर्थाने व्यवहारात प्रचलित झालेला जातीदर्शक शब्द असून त्याचा शासन व्यवहारातील उपयोग हा या समाजाची अवहेलना करणारा ठरतो. म्हणून शासन व्यवहारातून "भंगी " या शब्दाचा वापर स्थगित करुन त्याऐवजी "रुखी" किंवा "बाल्मिकी" या शब्दाचा वापर शासन व्यवहारात करावा अशा प्रकारची निवेदने या समाजाच्या संघटनांकडून शासनास प्राप्त झाली आहेत.

२. याबाबत संबंधीतांना सूचना देण्याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता. म्हणून याबाबत केंद्र शासनाकडून मार्गदर्शन मागविण्यात आले होते. त्याबाबत केंद्र शासनाने त्यांच्या संदर्भाधीन दिनांक ११ मे, २००० च्या अर्ध शासकीय पत्रान्वये सूचना दिल्या आहेत, त्या सूचनांबाबत सर्वकष विचार करुन खालीलप्रमाणे निदेश देण्यात येत आहेत.

१) शासनाचे प्रशासकीय विभाग (मंडळे, महामंडळे, प्राधिकरणासह) आणि शाळा /महाविद्यालये (सरकारी व बिगर सरकारी (खाजगी)) विद्यापीठे व इतर संस्था याठिकाणी दप्तरातील अभिलेख्यात ज्याठिकाणी "भंगी " या शब्दाचा शब्दप्रयोग करण्यात आला आहे. त्याठिकाणी यापुढे "रुखी" किंवा "बाल्मिकी " असा शब्दप्रयोग करावा.

२) वरील सुधारणा (बदल) हा ग्रामपंचायत व इतर महसूली अभिलेख्यात देखील करावा.

३) मागासवर्गीय वस्ती असलेला जो भाग( शहराचा/गावाचा /रस्ता, विभाग) "भंगीवाडा" म्हणून ओळखला जातो / संबोधला जातो त्या भागास "रुखीवाडा" किंवा "बाल्मिकीवाडा" म्हणून ओळखले जावे / संबोधले जावे.

कृ.मा.प....

३. हे परिपत्रक "रुखी" किंवा "बाल्मिकी" या शब्दाचा शब्दप्रयोग दैनंदिन व्यवहार, व्यावहारिक देवाणघेवाण व प्रचलित शासकीय पत्रव्यवहारात व्हावा या उद्देशाने काढण्यात आले आहे. परंतु याचा कोणताही विपरीत परिणाम संविधानात उल्लेखिलेल्या शब्द किंवा तत्सम शब्द, सफाई कामगार बंधूसाठी केलेल्या कायदेशीर तरतूदीवर आणि त्यानुसार त्यांना मिळत असलेल्या फायद्यांवर होणार नाही.

४. सर्व मंत्रालयीन विभागांनी सदर आदेश त्यांच्या अधिपत्याखालील सर्व विभाग प्रमुख व कार्यालय प्रमुख यांच्या निदर्शनास आणून याबाबत तात्काळ अंमलबजावणी करण्याबाबत कळविण्यात यावे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

(नं. मा. शिलवंत)
अवरसचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,
राज्यपालांचे सचिव
मुख्यमंत्र्यांचे सचिव
सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई
महालेखापाल, महाराष्ट्र - १ मुंबई महाराष्ट्र- २, नागपूर
सर्व विभागीय आयुक्त,
प्रबंधक, उच्च न्यायालय (अपिल शाखा), मुंबई
प्रबंधक, उच्च न्यायालय (मूळ शाखा) मुंबई
संचालक, समाजकल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे
संचालक, शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे
आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक
संचालक, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे
सर्व मंत्रालयीन विभाग
सर्व जिल्हा दंडाधिकारी,
सर्व उपविभागीय आयुक्त (महसूल)
सर्व उपजिल्हाधिकारी
महासंचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय, मंत्रालय, मुंबई
सर्व जिल्हा परिषदा, मुख्य कार्यकारी अधिकारी,
सर्व तालुका कार्यकारी दंडाधिकारी
सर्व विभागीय समाजकल्याण अधिकारी /सर्व जिल्हा समाजकल्याण अधिकारी
सर्व जिल्हा परिषदा, समाजकल्याण अधिकारी / सर्व कार्यासने, स.क.सां.का. व क्री. विभाग
निवड नस्ती, मावक -२